0 3 FEB 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाविद्यालये आजपासून सुरू

## जिल्हाधिकारी रेखावार; नियम व अटींचे पालन करण्याचे आवाहन

कोल्हापूर, ता. २ : जिल्ह्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे, तंत्रनिकेतन इतर शैक्षणिक संस्थांमधील वर्ग गुरुवारपासून (ता. ३) नियमित सुरू करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी आज दिल्या. महाविद्यालये सुरू करताना कोरोना प्रतिबंधक नियम व अटींचे पालन करावे. जी महाविद्यालये प्रतिबंधात्मक क्षेत्रात आहेत, ती महाविद्यालये सुरू करता येणार नाहीत, असेही नमूद केले आहे.

जिल्हाधिकारी रेखावार यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे, जानेवारीत शाळा सुरू करण्याबाबत ज्या नियम अटी दिल्या आहेत. त्यांचे तंतोतंत पालन केले पाहिजे. ज्या प्राध्यापकांचे कोरोना प्रतिबंधक लशीचे दोन्ही डोस पूर्ण झाले आहेत. तसेच ४८ तासांपूर्वी कोरोनाची आरटीपीसीआर चाचणी केली आहे. अशाच प्राध्यापकांना महाविद्यालयात उपस्थित राहून शिकवणी घेता येईल. ग्रामीण किंवा शहरी (कोल्हापूर वगळून) भागातील १ टक्के लोकसंख्या किंवा १०० यापैकी जी कमी असेल एवढे कोरोना रुग्ण असतील, त्या ठिकाणी व्यवस्थापन समिती नियुक्त करावी. या समितीने प्रत्येक वर्गात ५० टक्के विद्यार्थी दिवसाआड या पध्दतीने शिकवणीसाठी उपस्थित ठेवावीत. बाधित क्षेत्रांमधील विद्यार्थांना महाविद्यालयात प्रवेश देऊ नये. प्रत्येक कॉलेजमध्ये कोरोनाप्रतिबंधक लसीकरण करण्यासाठी स्वतंत्र शिबिराचे आयोजन करावे. ज्या शिक्षक किंवा विद्यार्थांनी लस घेतलेली नाही, अशा विद्यार्थ्यांना लसीकरण करावे. महाविद्यालयातच १० फेब्रुवारीपर्यंत लसीकरणाची मोहीम राबवावी, असेही श्री. रेखावार यांनी नमूद केले आहे. जे महाविद्यालय किंवा विद्यार्थी नियमांचे पालन करणार नाहीत, अशांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशा सूचनाही ज्या त्या तहसीलदार, तलाठी व पोलिस ठाण्याला दिल्या आहेत.

### ठळक मुद्दे :

- प्राध्यापकांना लशीचे दोन डोस बंधनकारक
- प्रतिबंधात्मक क्षेत्रातील महाविद्यालये बंदच राहतील
- १० फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालयातच लसीकरण करा
- प्राध्यापकांना ४८ तासांपूर्वी आरटीपीसीआर चाचणी गरजेची
- ५० टक्के विद्यार्थ्यांना दिवसाआड शिक्षण

03 FEB 2022 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यातील महाविद्यालये आजपासून सुरु

## प्रशासनाचा निर्णय : कोरोना नियमात शिथिलता

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जिल्ह्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे, तंत्रनिकेतन, शैक्षणिक संस्थांमधील नियमित वर्ग गुरुवारपासून सुरु करण्यास अटी व शर्तीस अधीन राहून परवानगी दिली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष राहुल रेखावार यांनी बुधवारी दिले.

कोरोना प्रादुर्भाव गंभीर होणाऱ्या गाव व शहरांमधील शाळा व कनिष्ठ महाविद्यालये यांच्यासाठी स्वतंत्र



आदेश लागू केले जातील. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी दिला आहे.

२५ जानेवारी रोजीच्या परिपत्रकातील सर्व अटी-शर्तींचे पालन करणे बंधनकारक राहील. ज्यांचे दोन्ही लसीकरण पूर्ण झाले आहेत व कोरोनाची लक्षणे नाहीत अशाच शिक्षक व कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयामध्ये उपस्थित रहावे. लक्षणे असणाऱ्यांनी स्वतःची कोरोना चाचणी करुन घ्यावी. महाविद्यालये ऑनलाईन सुरु ठेवणे किंवा किमान ५० टक्के विद्यार्थी ऑनलाईन असतील याची खात्री करुन महाविद्यालये ऑनलाईन तसेच ऑफलाईन सुरु ठेवणेचे सांगितले.

**प्रतिबंधित क्षेत्रातील महाविद्यालये बंद**

कोरोना प्रतिबंधित क्षेत्रातील महाविद्यालये बंद राहतील. संबंधितांचे लसीकरण सत्र १० फेब्रुवारीपर्यंत महाविद्यालयात आयोजित करावे. तालुका आरोग्य अधिकारी व गट शिक्षण अधिकारी यांनी रोज संध्याकाळी आढावा घ्यावयाचा आहे.

जनसंपर्क कक्ष
03 FEB 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रंगलेल्या 'इंद्रधनुष्य' राज्यस्तरीय युवा महोत्सवाच्या सांगता कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ अभिनेते रमेश देव. व्यासपीठावर डॉ. आर. जी. दांडगे, तत्कालीन प्रभारी कुलगुरू डॉ. ए. ए. डांगे, डॉ. बी. एस. पाटील, डॉ. आर. बी. पाटील आदी. (२००९)



कोल्हापूर : विद्यापीठ हायस्कूलच्या वतीने अभिनेते रमेश व सीमा देव यांचा सत्कार करताना ॲड. धनंजय पठाडे. यावेळी शेजारी प्रदीप गबाले, राजश्री शिंदे, विद्या पठाडे, बी. डी. कुंभार आदी. (२०१७)

राहण्यासाठी मुंबईत शेतीही करतो. त्यातून उत्पादित होणाऱ्या भाज्या साऱ्या सोसायटीला आनंदाने वाटतो. कोल्हापूरच्या मातीत वाढलो. दारूला हात लावायचा नाही आणि तब्येतीकडे दुर्लक्ष करायचे नाही, हा आईचा सल्ला आयुष्यभर पाळला. त्यामुळेच आजही ठणठणीत आहे, असेही ते म्हणाले होते.

## जिंकण्यासाठी सौंदर्य नव्हे, हवे 'कॅरॅक्टर'

२००९ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित इंद्रधनुष्य राज्यस्तरीय युवा महोत्सवाची सांगता रमेश देव यांच्या उपस्थितीत अगदी जल्लोषात झाली. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. ए. ए. डांगे यांच्या अध्यक्षतेखाली दहा नोव्हेंबर २०१० रोजी हा कार्यक्रम झाला. जगाच्या विद्यापीठात सौदर्यापेक्षा 'कॅरॅक्टर'ला महत्त्व आहे. शिक्षण संपताचं तुमच्यातील कलाकार कुठे पळून जातो. ही सरड्याची धाव बस्स झाली. जिद्दीने कामाला लागा, तुमच्यातील कलाकाराला यशोशिखरावर पोचवा,'' असे आवाहन करत यावेळी रमेश देव यांनी तरुणाईशी संवाद साधला होता.

यशाच्या शिखरावर पोचायचे, तर त्यासाठी प्रत्येकाला एक अधिष्ठान हवे. ज्यातून सतत नवप्रेरणा मिळत जाते. छत्रपती शिवराय, राजर्षी शाहू हीच आपली प्रेरणास्थाने आहेत. मी कोल्हापूरचा. राजाराम कॉलेजचा विद्यार्थी. 'कॉलेज क्वीन'ला पटवण्यासाठी म्हणून तिला घेऊन भालजी पेंढारकरांच्या स्टुडिओत गेलो आणि तेथेच आयुष्यात पहिल्यांदा 'साइड आर्टिस्ट'चा रंग चेहऱ्याला लागला. पुढची वाटचाल केली ती केवळ जिद्दीच्या जोरावर. पुढे मराठी सिनेमाचा हीरो झालो; पण एका साध्या टपरीतल्या पोऱ्याने 'तुम्ही कसले हीरो?' असा अनपेक्षित प्रश्न विचारत मनोजकुमार, मधुबालाची छायाचित्रे दाखविली. त्यानंतर मनाशी खूणगाठ बांधली. हिंदी सिनेसृष्टीत धडपड सुरू केली. निर्माता-दिग्दर्शकांना भेटण्यासाठी तासन्‌तास थांबलो. त्यातही जिद्दीने यशस्वी झालो, अशी आठवणही त्यांनी यावेळी सांगितली होती.

0 3 FEB 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांची ॲकॅडमिक ॲकॅडमी स्वतंत्र स्थापन करावी : कुलगुरू डॉ. शिर्के

## न्यू एज्युकेशन सोसायटीचा वर्धापन दिन साजरा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

न्यू एज्युकेशन सोसायटीने क्रीडा ॲकॅडमी स्थापन केली आहे, तशीच शिक्षकांच्या विचारधारेस, नवनवीन बदलांचा विचार करण्यासाठी शिक्षकांची ॲकॅडमिक ॲकॅडमी स्थापन करावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : न्यू एज्युकेशन सोसायटीचा १०१ वा वर्धापन दिन कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. पद्माकर सप्रे, नितीन वाडीकर, प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, प्राचार्य एस.एस.चव्हाण, निर्मल लोहिया आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

न्यू एज्युकेशन सोसायटीचा १०१ वा वर्धापन दिन संस्थेच्या राम गणेश गडकरी सभागृहात झाला. अध्यक्षस्थानी न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पद्माकर सप्रे होते. यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संस्थेने १०१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. संस्था चालकांनी शंभर वर्षांपूर्वी शिक्षण व शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून संस्था स्थापन केली. भविष्यात एक घटक म्हणून संस्थेशी जोडला जाणार आहे. मेनन अँड मेननचे चेअरमन विजय मेनन म्हणाले, संस्थेने गुणवत्तेच्या आधारावर शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे. भविष्यात बदलत्या टेक्नॉलॉजीचा विचार करावा.

याप्रसंगी विविध शाळांमध्ये सेवा निवृत्त झालेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, १० वी व १२ वी परीक्षेतील विशेष गुणवत्ताप्राप्त, स्कॉलरशिप परीक्षेत प्रावीण्य मिळवलेले व बेस्ट एन.सी.सी. कॅडेटचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष नितीन वाडीकर यांनी प्रास्ताविकात संस्थेने स्थापनेपासून ते शतकोत्तर परंपरेपर्यंतच्या प्रगतीचा आढावा घेतला.

यावेळी संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अनिल लोहिया, नियामक मंडळाचे अध्यक्ष निर्मल लोहिया, उपाध्यक्ष नितीन वाडीकर, सदस्य नेमचंद संघवी, कुशल सामाणी, राजेश लोहिया, उत्कर्षा पाटील, अनिता सूर्यवंशी, संस्थेचे सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, प्राचार्य एस. एस. चव्हाण उपस्थित होते. सूत्रसंचालन वर्षा देशपांडे, स्नेहा फडणीस यांनी केले. संस्थेचे सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे यांनी आभार मानले.

0 3 FEB 2022

लोकमत

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांची स्वतंत्र अकॅडमी स्थापन करावी

## डॉ. डी. टी. शिर्के : दि न्यू एज्युकेशन सोसायटीचा वर्धापनदिन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शतकोत्तर परंपरा लाभलेल्या दि न्यू एज्युकेशन सोसायटीने जशी क्रीडा अकॅडमी स्थापन केली, तशीच शैक्षणिक क्षेत्रातील नवनवीन बदलांचा विचार करण्यासाठी शिक्षकांकरिता अकॅडमिक अकॅडमी स्थापन करावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी येथे केले.



दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापनदिनाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी दीपप्रज्वलन केले. यावेळी एस. एस. चव्हाण, नेमचंद संघवी, अनिल लोहिया, विजय मेनन, पद्माकर सप्रे, नितीन वाडीकर, प्रभाकर हेरवाडे उपस्थित होते.

दि. न्यू एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या १०१ व्या वर्धापनदिनानिमित्त राम गणेश गडकरी सभागृहातील कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पद्माकर सप्रे, तर मेनन अँड मेननचे अध्यक्ष विजय मेनन, संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष निर्मल लोहिया, उपाध्यक्ष नितीन वाडीकर, सदस्य नेमचंद संघवी, कुशल सामाणी, राजेश लोहिया, उत्कर्षा पाटील, अनिता सूर्यवंशी, सचिव, प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, प्राचार्य एस. एस. चव्हाण, सयाजी पाटील, उमा भेंडीगरी, प्रदीप पोवार उपस्थित होते. वर्षा देशपांडे, स्नेहा फडणीस यांनी आभार मानले.

### लोकनृत्याचा आविष्कार

ध्वजारोहणाने वर्धापनदिनाच्या कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर गणेशवंदना, संबलपुरी, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्याचा आविष्कार स. म. लोहिया हायस्कूल, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल, विमला गोएंका इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सादर केले.

0 3 FEB 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांसाठी ॲकॅडमिक ॲकॅडमी सुरू करा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन, दि न्यू एज्युकेशन सोसायटीचा वर्धापनदिन उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

दि न्यू एज्युकेशन सोसायटीचा १०१ वा वर्धापन दिन साजरा करताना क्रीडा, कला, शिक्षण क्षेत्रात प्रगती केली आहे. एखाद्या संस्थेचा वाढदिवस म्हणजे त्या संस्थेचे आयुष्य व व्याप्तीही वाढते. क्रीडा ॲकॅडमीप्रमाणे अत्याधुनिक बदलाचे प्रशिक्षण घेण्यासाठी शिक्षकांसाठी ॲकॅडमीक ॲकॅडमी उभाराची, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

पेटाळा येथील दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या १०१ व्या वर्धापन दिनानिमित्त राम गणेश गडकरी हॉल येथील आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मेनन ॲण्ड मेननचे चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर विजय मेनन यांची प्रमुख उपस्थिती होती. दि न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पद्माकर सप्रे अध्यक्षस्थानी होते.



**कोल्हापूर : दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापनदिनी दीपप्रज्वलन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्राचार्य एस. एस. चव्हाण, नेमचंद संघवी, अनिल लोहिया, विजय मेनन, पद्माकर सप्रे, नितीन वाडीकर, प्रभाकर हेरवाडे.**

चेअरमन विजय मेनन म्हणाले, संस्थेने १०१ वर्षे गुणवत्तेच्या जोरावर पूर्ण केली आहेत. संस्थेने शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात राज्यभर लौकिक मिळवला आहे. भविष्यात येथून पुढील येणाऱ्या २५ वर्षाच्या बदलत्या टेक्नॉलाजीचा विचार करावा.

सेवानिवृत्त झालेल्या १२ शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी, शिष्यवृत्ती परीक्षेत प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी, एन. सी. सी. कॅडेटस यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष नितीन वाडीकर यांनी प्रास्ताविक केले. वर्षा देशपांडे व स्नेहा फडणीस यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य प्रभाकर हेरवाडे यांनी आभार मानले. यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अनिल लोहिया, निर्मल लोहिया, नेमचंद संघवी, कुशल सामाणी, राजेश लोहिया, उत्कर्षा पाटील, अनिता सुर्यवंशी, प्राचार्य एस. एस. चव्हाण, सयाजी पाटील, उमा भेंडीगरी, प्रदीप पोवार उपस्थित होते.

03 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षकांची देखील स्वतंत्र ॲकॅडमी स्थापन करावी

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : दि न्यू एज्युकेशन सोसायटीचा १०१ वा वर्धापन दिन उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संस्थेने क्रीडा ॲकॅडमी स्थापन केली. त्याचप्रकारे शिक्षकांच्या विचारधारेस व नवनवीन बदलांचा विचार करण्यासाठी शिक्षकांची देखील ॲकॅडमी स्थापन करावी, असे अवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. ते दि एज्युकेशन सोसायटीच्या १०१ व्या वर्धापन दिनानिमित्त राम गणेश गडकरी सभागृहामध्ये आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संस्था चालकांनी १०० वर्षांपूर्वी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे ओळखून संस्था स्थापन केली. आज एक पाहुणा म्हूणन जरी उभा असलो तरी भविष्यात एक घटक म्हणून मी जोडला जाणार आहे.

कार्यक्रमास मेनन अँड मेननचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक विजय मेनन म्हणाले, संस्थेने १०० वर्षे गुणवत्तेच्या आधारावर पूर्ण केली आहेत. संस्थेने शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रात संपूर्ण राज्यभर नावलौकिक मिळवला आहे. भविष्यात येथून पुढील येणाऱ्या २५ वर्षांच्या बदलत्या टेक्नॉलॉजीचा विचार करावा.

श्री गणेश वंदना, संबलपुरी लोकनृत्य व शास्त्रीय नृत्य अविष्कार ही नत्ये स. म. लोहिया हायस्कूल, प्रिन्सेस पद्माराजे गर्ल्स हायस्कूल व विमला गोएंका इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या वतीने सादर करण्यात आली.



**कोल्हापूर : दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या वर्धापन दिन कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्वलनाने करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत अन्य मान्यवर.**

दि. न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पद्माकर सप्रे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच संस्थेच्या विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष अनिल लोहिया, नियामक मंडळाचे अध्यक्ष निर्मल लोहिया, उपाध्यक्ष नितीन वाडीकर, सदस्य नेमचंद संघवी, कुशल सामाणी, राजेश लोहिया, उत्कर्षा पाटील, अनिता सूर्यवंशी सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे, प्राचार्य एस. एस. चव्हाण, सयाजी पाटील, उमा भेंडिगरी, प्रदीप पोवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले. प्रास्ताविक उपाध्यक्ष नितीन वाडीकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संस्थेच्या विविध शाळांमधून निवृत्त झालेल्या १२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना, १० वी व १२ वी मार्च २०२१ परीक्षेतील विशेष गुणवत्ता प्राप्त, स्कॉलरशिप परीक्षेत प्रावीण्य मिळवणारे, बेस्ट एन.सी.सी.कॅडेटचा सत्कार करण्यात आला. सचिव प्राचार्य प्रभाकर हेरवाडे यांनी मानले. सूत्रसंचालन वर्षा देशपांडे व स्नेहा फडणीस यांनी केले.

लोकमत




पार्श्वनाथ बँकेच्या वर्धापनदिन कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. यावेळी विनोद मेहता, पूनम शाह, शंकर पाटील, सत्यजित कदम, आदी उपस्थित होते.

# अत्याधुनिक सुविधा देण्यात पार्श्वनाथ बँक अग्रेसर : शिर्के

कोल्हापूर : पार्श्वनाथ बँकेने प. महाराष्ट्रात पहिली ए.टी.एम. सेवा सुरू करून अत्याधुनिक बँकिंग सुविधा देण्यात अग्रेसर राहिल्याचे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. पार्श्वनाथ बँकेच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

अध्यक्ष विनोद मेहता म्हणाले, ३६५ दिवस सर्व बँकिंग सुविधांसह तत्पर सेवा देणारी ही एकमेव बँक आहे. ग्राहकांना नवतंत्रज्ञान उपलब्ध करणार आहे. उपाध्यक्षा पूनम शाह, वसंतराव चौगुले पतसंस्थेचे अध्यक्ष अनिल पाटील, डॉ. संतोष प्रभू, जिल्हा बँक संचालक बाबासाहेब पाटील, माजी नगरसेवक सत्यजित कदम, सुनील कदम, सुहास लटोरे, वाय. ए. पाटील, डॉ. डी. ए. पाटील उपस्थित होते. तज्ज्ञ संचालक शंकर पाटील यांनी स्वागत केले. सरव्यवस्थापक जयसिंग पाटील यांनी प्रास्ताविक केले. सीईओ तुळशीराम लटकन यांनी आभार मानले.

सकाळ

# डॉ. बाविस्कर यांच्याशी शनिवारी ऑनलाईन संवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातर्फे 'लेखक आपल्या भेटीस' (मीट द ऑथर) उपक्रमांतर्गत लेखक आणि पंडित जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या सेंटर फॉर फ्रेंच अँण्ड फॅरकोफोन स्टडीज अधिविभागातील प्रा. डॉ. शरद बाविस्कर यांचे शनिवारी (ता. ५) दुपारी तीनला ऑनलाईन पद्धतीने व्याख्यान होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, विद्यार्थी, संशोधकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन इंग्रजी अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले.

03 FEB 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केंद्रीय विज्ञान, तंत्रज्ञान मंत्रालयाकडून अडीच कोटींचा प्रकल्प

## शिवाजी विद्यापीठाला 'स्तुती' अंतर्गत लाभ : सैफ सीएफसी विभाग प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

केंद्राच्या विज्ञान, तंत्रज्ञान मंत्रालयाच्या 'स्तुती' या विशेष प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठास सुमारे अडीच कोटींचा प्रकल्प तत्वतः मंजूर केल्याची माहिती विद्यापीठाच्या सैफ (SAIF), सीएफसी विभागांचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

डॉ. सोनकवडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अल्पकालीन अभ्यासक्रम आणि कार्यशाळांच्या माध्यमातून विविध उपकरणे, विश्लेषणात्मक तंत्रांबद्दल लोकप्रियता आणि जागरूकता वाढवण्यासाठी विज्ञान। तंत्रज्ञान मंत्रालयाकडून 'स्तुती' (STUTI - Synergistic Training program Utilizing the Scientific and Technological Infrastructure) या प्रशिक्षण उपक्रमाची सुरवात केली आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाकडून प्रकल्प प्रस्ताव सादर केला होता. त्यास केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून मंजुरी दिल्याचे पत्र विद्यापीठास पाठवले आहे. एक वर्षासाठी या प्रकल्पातील उपक्रम 'आझादी का अमृत महोत्सवांतर्गत' साजरे करण्यात येणार आहेत. यांतर्गत किमान ३० जणांचा सहभाग असणाऱ्या २५ प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येणार आहेत. २२ ते २८ फेब्रुवारी दरम्यान विज्ञान सप्ताहांतर्गत किमान ५० सहभागींसाठी १४ जागरूकता शिबिरे आयोजिली जाणार आहेत. यासाठी मंत्रालयाकडून २ कोटी ५१ लाखांची तरतूद केली आहे. प्रकल्पाच्या वैज्ञानिक सल्लागार समितीमध्ये डॉ. सोनकवडेसह नॅनो सायन्स व तंत्रज्ञान विभागातील डॉ. के. डी. पवार डॉ. टी. डी. डोंगळे सह-अन्वेषक म्हणून काम करणार आहेत. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी डॉ. सोनकवडेंचे अभिनंदन केले.



### संशोधक, विद्यार्थ्यांसह उद्योजक-व्यावसायिकांना लाभ

विद्यापीठातील मध्यवर्ती सुविधा केंद्रात डीएसटी-सैफ उपक्रमांतर्गत विविध अत्याधुनिक शास्त्रीय उपकरणे विश्लेषणासाठी उपलब्ध केली आहेत. त्यांचा जास्तीत जास्त उपयुक्त वापर शैक्षणिक संशोधनासह उद्योग-व्यवसाय क्षेत्रासाठी व्हावा, त्या संदर्भात यथायोग्य जनजागृती व्हावी, या हेतूने केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने 'स्तुती' उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. डॉ. सोनकवडे यांनी हा विभाग लोकाभिमुख करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. या उपक्रमांत सहभागी होण्याची संधी संशोधक, विद्यार्थी यांच्यासह उद्योग-व्यवसाय क्षेत्रांनीही घ्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले आहे.

03 FEB 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान'ला शासनाचा पुरस्कार

## पहिलेच पुस्तक : प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र प्रकारातून निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' या पुस्तकाला यंदाचा राज्य शासनाचा नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार बुधवारी जाहीर झाला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा केली. त्यामध्ये प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र/ व्याकरण या साहित्य प्रकारासाठीचा एक लाख रुपयांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार 'बोलीविज्ञान' पुस्तकाला जाहीर झाला. कोल्हापूरच्या भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले.




पहिल्याच पुस्तकाला थेट शासनाचा पुरस्कार लाभणे, ही बाब अतिशय आनंद देणारी आहे. भाषाविज्ञानासारखा गहन विषय सोपा करून सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला. हे प्रयत्न यशस्वी झाल्याची पोचपावती पुरस्कारामुळे मिळाली. यापुढील काळातही अशा प्रकारे दर्जेदार संशोधन, लेखन करण्यासाठीची प्रेरणा या पुरस्काराने दिली असल्याची प्रतिक्रिया डॉ. सरवदे यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे यांनी डॉ. सरवदे यांचे अभिनंदन केले.

### बोली अभ्यासाची सारी स्थित्यंतरे

बोली अभ्यासाची वाटचाल सांगणारे पुस्तक मराठीत नव्हते. ही उणीव 'बोलीविज्ञान' या पुस्तकाने भरून काढली आहे. बोली अभ्यासाच्या प्रारंभापासून आजपर्यंतची सारी स्थित्यंतरे या पुस्तकातून सांगितलेली आहेत. काळानुसार बोलीअभ्यासात परिवर्तन झाले. हे परिवर्तन बोली अभ्यासाची बदलत गेलेली उद्दिष्टे अधोरेखित करते.



औदुंबर सरवदे

03 FEB 2022 लोकसत्ता जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापुरातील डॉ. सरवदे, डॉ. पाटील यांना शासनाचा वाङ्मय पुरस्कार जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील दोन साहित्यिकांना महाराष्ट्र शासनाचा वाङ्मय पुरस्कार बुधवारी जाहीर झाला आहे. प्रा. डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' या पुस्तकाला नरहर कुरुंदकर वाङ्मय तर, बाल वाङ्मय कादंबरीसाठी साने गुरुजी पुरस्कार डॉ. श्रीकांत पाटील यांच्या 'सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल' या पुस्तकासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे.

राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र, व्याकरण या



औदुंबर सरवदे श्रीकांत पाटील

साहित्य प्रकारासाठीचा १ लाख रुपयांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील डॉ. औदुंबर सरवदे यांच्या''बोलीविज्ञान' पुस्तकाला जाहीर झाला.

येथील भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

डॉ. सरवदे म्हणाले,की पहिल्याच पुस्तकाला थेट शासनाचा पुरस्कार लाभणे ही आनंद देणारी बाब आहे. भाषाविज्ञानासारखा गहन विषय सोपा करून सांगण्याच्या प्रयत्नाला पुरस्कारामुळे पोचपावती मिळाली आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे यांनी डॉ. सरवदे यांचे अभिनंदन केले आहे.

दरम्यान, बाल वाङ्मय कादंबरीसाठी साने गुरुजी पुरस्कार कोल्हापूरचे डॉ. श्रीकांत पाटील यांना जाहीर झाला आहे. हृदय प्रकाशनच्या 'सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल' या पुस्तकासाठी ५० हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे.

पुढारी

# कोल्हापूरच्या डॉ. सरवदे, डॉ. श्रीकांत पाटील यांना शासनाचा वाङ्मय पुरस्कार



डॉ. औदुंबर सरवदे


**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारकडून घोषित झालेल्या यंदाच्या नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कारासाठी शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' या पुस्तकाची निवड करण्यात आली आहे. प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र, व्याकरण या साहित्य प्रकारासाठी हा पुरस्कार आहे. पुरस्काराची रक्कम १ लाख रुपये असून, हे पुस्तक कोल्हापूरच्या भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.

तर, बाल वाङ्मय कादंबरीसाठी साने गुरुजी पुरस्कार डॉ. श्रीकांत पाटील यांना जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार ५० हजार रुपयांचा असून, पाटील यांच्या हृदय प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल' या पुस्तकासाठी देण्यात आला आहे.

## भारत सासने यांना जीवनगौरव पुरस्कार



राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साहित्यिकांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते, यावर्षी विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक आणि ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष भारत सासने यांना जाहीर करण्यात आला आहे. पाच लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. राज्याचे मराठी भाषामंत्री सुभाष देसाई यांनी बुधवारी वाङ्मय पुरस्कारांची घोषणा केली. या वाङ्मय पुरस्कारामध्ये माजी अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे व उत्तम कांबळे यांचाही समावेश आहे.

तरूण भारत

# बोलीविज्ञान पुस्तकाला राज्य शासनाचा पुरस्कार

## विद्यापीठातर्फे डॉ. सरवदेंचा सत्कार



प्रतिनिधी

कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा झाली. त्यामध्ये प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र, व्याकरण यासाठीचा एक लाख रुपयांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार 'बोलीविज्ञान' पुस्तकाला जाहीर झाला. हे पुस्तक शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी अधिविभागातील डॉ. औदुंबर सरवदे यांनी लिहीले आहे.

'बोलीविज्ञान' डॉ. सरवदे यांचे पहिलेच पुस्तक. डॉ. सरवदे यांच्या पहिल्याच पुस्तकाला पुरस्कार जाहीर झाल्याचे समजताच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे त्यांचे अभिनंदन केले.

बोली अभ्यासाला सुमारे दीडशे वर्षांची दीर्घ परंपरा आहे. बोली अभ्यासाची वाटचाल सांगणारे पुस्तक मराठीत नव्हते. ही उणीव 'बोलीविज्ञान' या पुस्तकाने भरून काढली आहे. बोली अभ्यासाच्या प्रारंभापासून आजपर्यंतची सारी स्थित्यंतरे या पुस्तकात आहेत.

### या पुरस्काराने लेखन करण्याची प्रेरणा मिळाली

पहिल्याच पुस्तकाला थेट महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभणे, ही बाब अतिशय आनंद देणारी आहे. भाषाविज्ञानासारखा गहन विषय सोपा करून सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला. हे प्रयत्न यशस्वी झाल्याची पोहोचपावती पुरस्कारामुळे मिळाली. यापुढील काळातही अशा प्रकारे दर्जेदार संशोधन व लेखन करण्यासाठीची प्रेरणा या पुरस्काराने दिली आहे.

**- डॉ. औदुंबर सरवदे** (इंग्रजी विभाग, शिवाजी विद्यापीठ)

पुढारी

# डॉ. औदुंबर सरवदे यांना महाराष्ट्र शासनाचा नरहर कुरुंदकर पुरस्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' या पुस्तकाला यंदाचा महाराष्ट्र शासनाचा नरहर कुरुंदकर वाङ्मय पुरस्कार जाहीर झाला. एक लाख रुपये व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा बुधवारी करण्यात आली. त्यामध्ये प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र, व्याकरण या साहित्य प्रकारासाठी हा पुरस्कार जाहीर झाला. कोल्हापूरच्या भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे.

पुरस्कारासंदर्भात भावना व्यक्त करताना डॉ. सरवदे म्हणाले, बोली अभ्यासाला सुमारे दीडशे वर्षांची दीर्घ परंपरा आहे. जगभरात झालेल्या बोली अभ्यासामुळे आणि या अभ्यासातून पुढे येत गेलेल्या निष्कर्षांमुळे भाषा अभ्यासाचा विकास झालेला दिसतो. तथापि, बोली अभ्यासाची वाटचाल सांगणारे पुस्तक मराठीत नव्हते, ही उणीव 'बोलीविज्ञान' या पुस्तकाने भरून काढली आहे. बोली अभ्यासाच्या प्रारंभापासून आजपर्यंतची सारी स्थित्यंतरे या पुस्तकातून सांगितलेली आहेत. काळानुसार बोली अभ्यासात परिवर्तन झाले. हे परिवर्तन बोली अभ्यासाची बदलत गेलेली उद्दिष्टे अधोरेखित करते. या उद्दिष्टांनुसार झालेला अभ्यास प्रस्तुत पुस्तकातून वाचकांसमोर येतो.

पहिल्याच पुस्तकाला थेट महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभणे, ही बाब अतिशय आनंद देणारी आहे. भाषाविज्ञानासारखा गहन विषय सोपा करून सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला. हे प्रयत्न यशस्वी झाल्याची पोचपावती पुरस्कारामुळे मिळाली.

0 3 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. सरवदे, डॉ. पाटील यांना शासनाचे साहित्य पुरस्कार

## 'बोलीविज्ञान', 'सिंमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल'चा गौरव

**कोल्हापूर, ता. २ :** महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा आज झाली. प्रौढ वाङ्मय- भाषाशास्त्र, व्याकरण या साहित्य प्रकारासाठीचा एक लाख रुपयांचा नरहर कुरुंदकर पुरस्कार प्रा. डॉ. औदुंबर सरवदे यांच्या 'बोलीविज्ञान' पुस्तकाला जाहीर झाला आहे. घुणकी (ता. हातकणंगले) येथील डॉ. श्रीकांत पाटील यांच्या 'सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल' या पुस्तकाला बालवाङ्मय कादंबरी या साहित्य प्रकारासाठीचा ५० हजारांचा सानेगुरुजी पुरस्कार जाहीर झाला.



**औदुंबर सरवदे**



**श्रीकांत पाटील**

प्रा. डॉ. सरवदे शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागात प्राध्यापक आहेत. येथील भाषा विकास संशोधन संस्थेतर्फे त्यांचे पुस्तक प्रकाशित केले आहे.

> **पहिल्याच पुस्तकाला थेट महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार लाभणे, ही बाब अतिशय आनंद देणारी आहे. भाषाविज्ञानासारखा गहन विषय सोपा करून सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे केला. हे प्रयत्न यशस्वी झाल्याची पोचपावती पुरस्कारामुळे मिळाली.**
> **- डॉ. औदुंबर सरवदे**

> **राज्य वाङ्मय पुरस्काराने यापूर्वीही सन्मान झाला आहे. लॉकडाउन काळात लिहिलेल्या कादंबरीला आता पुन्हा हा सन्मान मिळाला. या पुरस्कारामुळे जबाबदारी आणखी वाढली असून, येत्या काळातही कसदार लेखनाचा नक्कीच प्रयत्न राहील.**
> **- डॉ. श्रीकांत पाटील**

बोली अभ्यासाला सुमारे १५० वर्षांची दीर्घ परंपरा आहे. जगभरात झालेल्या बोलीअभ्यासामुळे आणि या अभ्यासातून पुढे येत गेलेल्या निष्कर्षांमुळे भाषा अभ्यासाचा विकास झालेला दिसतो. तथापि, बोली अभ्यासाची वाटचाल सांगणारे पुस्तक मराठीत नव्हते. ही उणीव 'बोलीविज्ञान' या पुस्तकाने भरून काढली आहे.

बोली अभ्यासाच्या प्रारंभापासून आजपर्यंतची सारी स्थित्यंतरे या पुस्तकातून सांगितलेली आहेत. काळानुसार बोली अभ्यासात परिवर्तन झाले. हे परिवर्तन बोली अभ्यासाची बदलत गेलेली उद्दिष्टे अधोरेखित करते.

डॉ. पाटील पेठवडगाव येथील बळवंतराव यादव हायस्कूलमध्ये शिक्षक असून, यापूर्वीही त्यांना दोन राष्ट्रपती, तर एक राज्य वाङ्मय पुरस्कार मिळाला आहे. लॉकडाउन काळात त्यांनी 'सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल'' ही कादंबरी लिहिली आहे. लॉकडाउन काळात माणसं घरात थांबून राहिली. पण, जंगलातील प्राण्यांचा मात्र मुक्तपणे विहार सुरू राहिला. या मंडळींनी सिमेंटच्या जंगलात सहल काढायची ठरवली तर काय अनुभवायला मिळेल, अशा मध्यवर्ती संकल्पनेवर ही कादंबरी साकारली आहे.

03 FEB 2022

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## राज्य सरकारच्या साहित्य पुरस्कारांची घोषणा

# भारत सासणे यांना विंदा करंदीकर जीवनगौरव

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई** राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी देण्यात येणारा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व उदगीरमध्ये होणाऱ्या नियोजित मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे यांना तर प्रकाशन क्षेत्रातील श्री. पु. भागवत पुरस्कार हा 'लोकवाङ्मय गृह' या संस्थेला देण्यात येत असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केली.

कथाकार भारत सासणे यांना देण्यात येणाऱ्या विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये रोख, मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे. तर लोकवाङ्मय गृहाला देण्यात येणाऱ्या श्री. पु. भागवत पुरस्काराचे स्वरूप तीन लाख रुपये रोख आणि मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

डॉ. अशोक केळकर मराठी भाषा अभ्यास पुरस्कार रमेश वरखेडे यांना जाहीर करण्यात



आला. दोन लाख रुपये रोख व मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कविवर्य मंगेश पाडगांवकर, मराठी भाषा संवर्धक पुरस्कार( २०२१, व्यक्तींसाठी) डॉ. चंद्रकांत पाटील यांना जाहीर करण्यात आला. डॉ. अशोक केळकर, मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार २०२१( संस्थेसाठी) मराठी अभ्यास परिषद पुणे यांना जाहीर करण्यात आला. तर कविवर्य मंगेश पाडगावंकर मराठी भाषा संवर्धक पुरस्कार २०२१( संस्थेसाठी) मराठी भाषा अभ्यास केंद्र, मुंबई यांना जाहीर करण्यात आला.

'लोकसत्ता'चे स्तंभलेखक सॅबी परेरा आणि डॉ. मृदुला बेळे यांचाही पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे.

**स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्काराचीही घोषणा करण्यात आली. त्याची यादी पुढीलप्रमाणे**

### कथन, काव्य विभाग

कवी केशवसुत पुरस्कार - हेमंत दिवटे (पॅरानोया), बहिणाबाई चौधरी पुरस्कार - राजू देसले (अवधेचि उच्चार), राम गणेश गडकरी पुरस्कार - जयंत पवार (लिअरने जगावं की मरावं ?), हरी नारायण आपटे पुरस्कार - भीमराव वाघचौरे (किंजाळकाटे), श्री.ना.पेंडसे पुरस्कार - अविनाश उषा वसंत (पटेली), दिवाकर कृष्ण पुरस्कार - माधव जाधव (चिन्हांकित यादीतली माणसं), ग. ल. ठोकळ पुरस्कार - रुस्तम होनाळे (वऱ्हाडातली बिऱ्हाडं), अनुवादित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार - अनुवादक - मिलिंद चंपानेरकर (द ग्रेप्स ऑफ रॅथ), भाई माधवराव बागल पुरस्कार- धनंजय जोशी (सहज),

### कथेतर विभाग...

अनंत काणेकर पुरस्कार - अरुण खोपकर (अनुनाद), ताराबाई शिंदे पुरस्कार - डॅनिअल फ्रान्सिस मस्करहान्स (मंच), श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार - सॅबी परेरा (टपालकी), न.चिं.केळकर पुरस्कार - डॉ. अक्षयकुमार काळे (गालिब : काळ), लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार - डॉ. शाहू रसाळ (रानफूल, लव्ह बर्डस आणि...मी), श्री. के. क्षीरसागर पुरस्कार- गंगाधर पाटील (कलाकृती आणि समीक्षा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार - उत्तम कांबळे (अस्वस्थ शतकातील माणगाव परिषद), शाहू महाराज पुरस्कार-शशिकांत गिरिधर पित्रे (या सम हा) नरहर कुरुंदकर पुरस्कार - औदुंबर सरवदे (बोलीविज्ञान), महात्मा जोतीराव फुले पुरस्कार - डॉ.बाळ फोंडके (करोनाष्टक), लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार - अनंत केदारे (वाग्दान), ना. गो. नांदापूरकर पुरस्कार- डॉ. शोभा पाटकर (मना मना दार उघड), कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार- डॉ.राणी बंग व करुणा गोखले (तारुण्यभान), डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार - डॉ. मृदुला बेळे (करोनाच्या कृष्णछायेत), रा. ना. चव्हाण पुरस्कार- संपादक राम जगताप व भाग्यश्री भागवत (मायलेकी बापलेकी),

### बाल-कुमार विभाग...

बालकवी पुरस्कार- एकनाथ आव्हाड (शब्दांची नवलाई), भा.रा. भागवत पुरस्कार - शशिकांत बा. पाताडे (भातुकली आणि तीन धमाल बालनाट्य), साने गुरूजी पुरस्कार- डॉ. श्रीकांत पाटील (सिमेंटच्या जंगलात प्राण्यांची सहल), राजा मंगळवेढेकर पुरस्कार - वसीमबार्री मणेर (मौजे पुस्तक संच १), यदुनाथ थत्ते पुरस्कार- किशोर माणकापुरे (विद्यार्थी दशेत महापुरुष अभ्यासताना), ना. धो. ताम्हणकर पुरस्कार - डॉ. वैशाली देशमुख (टीएनएज डॉट कॉम # २), सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार- गजानन यशवंत देसाई (ओरबिन)

पुढारी

# भाषा समृद्ध होण्यासाठी ती बोलती ठेवली पाहिजे : डॉ. मोरे

**उजळाईवाडी :** लाखो-करोडो रुपये खर्चून भाषा समृद्ध होत नसते, तर त्यासाठी ती बोलती ठेवली पाहिंजे, असे मत शिवाजी विद्यापीठचे मराठी विभागप्रमुख डॉक्टर नंदकुमार मोरे यांनी व्यक्त केले. कोल्हापूर विमानतळावर मराठी भाषा संवर्धन पंधरवडा सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विमानतळ संचालक कमल कुमार कटारिया होते. पोलिस उपनिरीक्षक विलास भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवअंतर्गत विमानतळावर विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक १४ जानेवारीपासून मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कोल्हापूर विमानतळावर साजरा करण्यात आला. या पंधरवड्यात विमानतळावर निबंध स्पर्धा, काव्यवाचन, व्याख्यान असे विविध उपक्रम राबवण्यात आले होते. विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र व चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले. यावेळी भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे अधिकारी, कर्मचारी, महाराष्ट्र पोलिस कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल कर्मचारी, आदींसह विविध विभागांचे कर्मचारी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# संशोधनासाठी पदवीस्तरापासून आवड गरजेची : डॉ. मोरे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

उत्तम संशोधन कार्यासाठी सर्व प्रथम विद्यार्थ्यांच्या मनात पदवी स्तरापासूनच आवड व चौकसपणा निर्माण झाला पाहिजे. ही आवाडच त्यांच्या संशोधनातील पहिले पाऊल आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना समिती अध्यक्ष डॉ. एन. एच. मोरे यानी केले.

भारती विद्यापीठात फार्मसी महाविद्यालयातील संशोधक विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षक यांच्यासाठी रिसर्च प्रमोशन अॅक्टिव्हिटी कार्यशाळेचे ऑनलाईन संयोजन केले होते, यावेळी ते बोलत होते.

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत ऑनलाईन रिसर्च प्रमोशन अॅक्टिव्हीटी कार्यशाळा पदवी स्तरावर संशोधनाचे बीज रुजावे या हेतूने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत आयोजित केलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य व शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना समिती अध्यक्ष डॉ . एच. एन. मोरे, उपप्राचार्य डॉ. एम. एस. भाटिया तसेच कार्यक्रमाचे मुख्य समन्वयक, शिवाजी विद्यापीठ अग्रणी महाविद्यालय योजना सेकटरी डॉ. डी. टी. गायकवाड यांच्या हस्ते झाले.

डॉ. एच. एन. मोरे म्हणाले, संशोधन कार्यातील रुची ही नवनिर्मितीला आवश्यक आहे. कोणत्याही गोष्टीत रुची निर्माण झाली की मनात एक मांडणी तयार होते. संशोधनासाठी पायाभूत असणाऱ्या गोष्टी मिळवण्यासाठी धडपड सुरु होते, त्यातूनच नवे संशोधन तयार होते.

यावेळी डॉ. भाटिया यांनी रिसर्च सेन्सटाझेशन स्कीम या संकल्पनेंतर्गत आयोजित कार्यशाळेचे विस्तृत विश्लेषण केले. कार्यशाळेअंतर्गत ९ कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपले स्वतःचे शोधनिबंध सादर केले. सूत्रसंचालन मोनिका साबळे, मुग्धा कांबळे यांनी, तर आभार डॉ. डी. टी. गायकवाड यांनी मानले.

03 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वास्तवतेच्या लिखाणासाठी साहित्य संमेलन पर्वणी

## डॉ. रणधीर शिंदे : दिनकररावजी यादव स्मृती साहित्य संमेलन

**शिरोळ : प्रतिनिधी**

शिरोळ परिसरात साहित्यिक व सांस्कृतिक चळवळ जोमाने वाढत आहे. समाजातील वास्तवतेचे लिखाण झाले पाहिजे यासाठी साहित्य संमेलन ही पर्वणी असते. दलितमित्र, दीनबंधू दिनकरराव यादव यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ होणारे साहित्य संमेलन नवचैतन्याबरोबरच बळ देण्याचे काम करत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख, समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

शिरोळ येथील शब्दगंध साहित्य परिषदेतर्फे श्री दत्त साखर कारखाना कार्यस्थळावर आयोजित दीनबंधू भाई दिनकररावजी यादव स्मृती साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून डॉ. शिंदे बोलत होते. संमेलनाचे उद्घाटन गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते झाले.

साहित्य संमेलनाची सुरुवात ग्रंथदिंडीने झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजन झाले.

विश्वास पाटील म्हणाले, दीनबंधू भाई दिनकरराव यादव यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात आदर्शवत कार्य केले आहे.

संमेलनात जीवनगौरव पुरस्कार देऊन ज्येष्ठ पत्रकार, कादंबरी लेखक सुनील इनामदार यांना तसेच कै. भाई दिनकरराव यादव जिल्हास्तरीय क्रीडा पुरस्कार देऊन राष्ट्रीय हॉकी खेळाडू सुस्मिता संजय पाटील यांना सन्मानित करण्यात आले. मानपत्राचे वाचन भीमराव धुळूबुळू, प्रा. अनिल कुंभार यांनी केले.



शिरोळ : ज्येष्ठ लेखक सुनील इनामदार यांना जीवनगौरव पुरस्कार देताना मान्यवर.

स्वागताध्यक्ष दलितमित्र डॉ. अशोकराव माने यांनी स्वागत केले. यावेळी पेर्ते व्हा प्रकाशनाचे कवी, शाहीर विष्णू पाटील लिखित 'गीतगंगा' हा काव्यसंग्रह डॉ. रणधीर शिंदे आणि मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. स्वागत शब्दगंध साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष दगडू माने यांनी, तर प्रास्ताविक विश्वनाथ बन्ने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संजय सुतार यांनी करून दिला. पद्माराजे विद्यालय आणि न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी स्फूर्तीगीत सादर केले. सूत्रसंचालन किरण पाटील, तर आभार संजय सुतार यांनी मानले. यावेळी श्री दत्तचे संचालक अनिलराव यादव, पृथ्वीराजसिंह यादव, प्रसाद कुलकर्णी,. माजी सरपंच गजानन संकपाळ, प्रा. संजय पाटील, प्रा. मोहन पाटील, शंतनू यादव, नगरसेवक इम्रान अत्तार, राजाराम कोळी, विदुला यादव, विजय आरगे, नीळकंठ ऊर्फ पिंटू फल्ले, बाळासाहेब कोळी, धनाजी पाटील, संजयसिंह यादव, संभाजीराव यादव, अरविंदराव यादव, विराजसिंह यादव, सचिन इनामदार, उल्हास पाटील, फिरोज मुजावर, नामदेव भोसले, भगवान कोळी, गोरखनाथ माने, पंडितराव काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

0 3 FEB 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिल्ह्यात आजपासून महाविद्यालये सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, विद्यापीठ, अभिमत विद्यापीठे, तंत्रनिकेतन तसेच अन्य शैक्षणिक संस्था गुरुवार दि. ३ पासून नियमित (ऑफलाईन) सुरू होणार आहेत. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी मंगळवारी तसे आदेश दिले.

राज्यातील महाविद्यालये ऑफलाईन (प्रत्यक्ष उपस्थित राहून) सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी अटींसह महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली आहे. दोन्ही डोससह ज्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे आणि ज्यांना कोरोनाची लक्षणे नाहीत अशा शिक्षक,

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

कर्मचारी व विद्यार्थ्यांना महाविद्यालयात उपस्थित राहता येणार आहे. ज्यांचे लसीकरण झालेले नाही, त्यांना दर ४८ तासांनी आरटीपीसीआर चाचणी करावी लागणार आहे. ज्या गावांत, शहरांत (कोल्हापूर शहर वगळून) जनगणनेच्या १ टक्का किंवा १०० यापैकी जे कमी असेल, तितके सक्रिय कोरोना रुग्ण असतील, तेथील महाविद्यालय व्यवस्थापन समिती, पालक व शिक्षक समित्यांनी तत्काळ बैठक घ्यावी. यानंतर प्रत्येक वर्गात ५० टक्के विद्यार्थी एक दिवसआड बोलवावे. विद्यार्थ्यांना दोन वर्गांमध्ये समसमान विभागून बसविणे आणि उपलब्ध सर्व शिक्षकांनी एकत्रित शिकवावे, असे आदेशात म्हटले आहे. यासाठी महाविद्यालयात दोन सत्रात भरविणे, शिक्षकांच्या दैनंदिन तासिका वाढवणे, महाविद्यालये ऑनलाईन सुरू ठेवणे यापैकी एक पर्यास स्वीकारावा, असेही या आदेशात म्हटले आहे.

जे विद्यार्थी स्वत: अथवा त्यांच्या घरात कोरोना बाधित असतील, ज्यांना लक्षणे असतील त्यांनी महाविद्यालयात येऊ नये. विद्यार्थी, प्राध्यापक व इतर कर्मचारी यांचे कोरोना लसीकरण महाविद्यालयात दि. १० फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करावे, असे आदेशात म्हटले आहे.